# नीतिमत्ता आणि प्रामाणिकता नीति

*विस्टेऑन कर्मचाऱ्यांसाठी मार्गदर्शनपर पुस्तिका*

Visteon®



# सूची

अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री . डोनाल्ड स्टेबिन्स यांचा संदेश ............ 3
विस्टेऑन वर्तन ........................................................................ 4
नीतिमत्ता आणि प्रामाणिकता नीति ............................................................ 5
विभिन्नता आणि सहभाग करून घेण्याची क्षमता ........................................ 5
सुरक्षा, आरोग्य आणि पर्यावरण ........................................................... 5
उत्पादन सुरक्षा आणि गुणवत्ता ............................................................ 5
कंपनी मालमत्ता आणि माहिती ............................................................ 6
पुस्तके, रेकॉर्ड्स आणि फायलिंग्स ........................................................ 6
बौद्धिक संपदा आणि गोपनीयता........................................................... 7
इनसायडर ट्रेडिंग ............................................................................ 7
स्वारस्यातील भिन्नता ....................................................................... 8
निष्पक्ष व्यवहार आणि स्पर्धा ............................................................... 9
निष्पक्ष व्यवहार आणि स्पर्धा ............................................................... 9
सारांश ...........................................................................................10
नीतिमत्ता हॉटलाईन दूरध्वनी क्रमांक ........................................................11

# स्वत:च्या उदाहरणाने अग्रगण्य



आजच्या जागतिक ऑटोमोटिव्ह उद्योगामध्ये स्पर्धा करण्यासाठी विस्टेऑन ही अधिक चांगली, लवचिक धोरण असणारी आणि सुस्थितीतील पुरवठादार बनलेली आहे. कंपनीच्या नीतिमत्ता आणि प्रामाणिकता नीतिमध्ये स्पष्ट करण्यात आलेल्या उच्च ईमानदारी आणि नैतिक व्यवहाराप्रति आमचे समर्पण आणि आमच्या कर्मचाऱ्यांच्या कठोर आणि खडतर प्रयत्नांमधून आम्ही हे साध्य केले आहे.

नैतिकता हा विस्टेऑनचा एक महत्त्वपूर्ण कॉर्पोरेट गुणधर्म आहे – ज्याच्याशी आमच्या कर्मचाऱ्यांनी कुठल्याही परिस्थितीमध्ये प्रामाणिक राहायला हवे. ही नीति सर्व शाखांमधील आणि सर्व स्तरांतील – आमच्या लहानात लहान कामकाजापासून आमच्या संचालक मंडळांमधील लोकांपर्यंत लागू आहे. नैतिकतेला धरून वागणे आणि ह्या नीतिमध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रमाणांशी एकनिष्ठ राहणे तसेच सर्व व्यावसायिक व्यवहारांमध्ये असे वर्तन कायम रखणे हे आमच्या कर्मचाऱ्यांकडून अपेक्षित आहे.

ह्या नीतिची समीक्षा तुम्ही करावी अशी इच्छा मी प्रकट करतो. ह्या सिद्धांतांचा तुमच्या स्वत:वर आणि तुमच्या कामामध्ये कशाप्रकारे परिणाम होतो हे तुम्ही पाहावे. मला विश्वास आहे की निष्ठेने वागून आपण सर्वोत्तम व्यावसायिक परिणाम प्राप्त करून उच्च नैतिक प्रमाण कायम करू शकू.

आपला विश्वासू,



डोनाल्ड जे. स्टेबिन्स
अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी



# विस्टेऑन ध्येय आणि वर्तन

विस्टेऑनचा पूर्ण विश्वास असलेल्या आणि त्यांना दैनंदिन व्यवहारासाठी मार्गदर्शन करणाऱ्या गोष्टींचे हे सिद्धांत प्रतिनिधित्व करतात.

## आमची महत्त्वाकांक्षा...

*अतुलनीय मूल्य प्रदान करणारी अभिनव, दर्जेदार उत्पादने प्रदान करण्यासाठी आमच्या ग्राहकांसोबत सर्वोत्तम भागीदारी करणे.*

## आम्ही नेहमीच...



**ईमानदारीने वागतो**
*जे योग्य आहे तेच करतो*

**दुसऱ्यांचा आदर करतो**
*जशी वागणूक आम्हांला मिळालेली आवडेल तीच वागणूक आम्ही इतरांना देतो*

**ग्राहकांना नेहमीच प्रथम प्राधान्य देतो**
*आमच्या ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही सर्व प्रयत्न करतो*

**आमच्या वचनबद्धता पूर्ण करतो**
*आमचे निर्णय, कामकाज आणि परिणाम यांची जबाबदारी स्वेच्छेने घेतो*

**एकत्र काम करतो आणि संवाद साधतो**
*इच्छित परिणाम साधण्यासाठी इतरांसोबत कार्य करतो*

**सातत्यपूर्ण सुधारणेसाठी आक्रमकपणे प्रयत्न करतो**
*आम्ही जे काही करतो त्यात सर्वोत्तम परिणाम प्राप्त करण्यासाठी प्रयास करतो*

# नीतिमत्ता आणि प्रामाणिकता नीति

***नीतिमत्ता आणि प्रामाणिकता नीतिचा जर भंग होत असेल तर त्याबद्दल माहिती देणे हे सर्व कर्मचाऱ्यांचे कर्तव्य आहे.***

## विभिन्नता आणि सहभागी करून घेण्याची क्षमता

*जिथे सर्व कर्मचाऱ्यांना आदराने वागवले जाते आणि जिथे विचारांमधील भिन्नतेचेही मूल्य जपले जाते अशा प्रकारचे वातावरण निर्माण करण्यासाठी आणि ते कायम राखण्यासाठी विस्टेऑन वचनबद्ध आहे.*

विस्टेऑनमध्ये आम्ही 'इन्क्लूजिव्ह' पर्यावरण निर्माण करण्यासाठी झटतो, म्हणजेच आमचे कर्मचारी, ग्राहक, पुरवठादार आणि मोठ्या स्तरावर – समाजाला समान संधी प्रदान करण्याचा आम्ही प्रयत्न करतो. कुठल्याही प्रकारचा त्रास किंवा दुय्यमपणाची वागणूक न देणारी कॉर्पोरेट संस्कृती निर्माण केल्यामुळे विस्टेऑनच्या व्यावसायिक यशामध्ये पूर्णपणे योगदान देण्याची संधी प्रत्येक कर्मचाऱ्याला प्राप्त होते.

## सुरक्षा, आरोग्य आणि पर्यावरण

*विस्टेऑनमध्ये प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्य आणि सुरक्षेला प्राथमिक महत्त्व आहे.*

कामाच्या ठिकाणी सुरक्षित कार्यपद्धती, परिस्थिती आणि कामकाज निर्माण करण्यासाठी विस्टेऑन वचनबद्ध आहे. सुरक्षित आणि निरोगी कामकाज पर्यावरण विकसित करण्यासाठी आणि ते स्थायी राखण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील असतो. विस्टेऑन ही जबावदार कॉर्पोरेट नागरिक असून नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धनही करते. आम्ही सर्व जरूरी पर्यावरणीय प्रमाणांची पूर्तता करतो. अनेकदा जरूरी विनियामक आणि कायदेविषयक प्रमाणांची पूर्तता त्यापलीकडेही आणखी काही करतो. घन आणि द्रव कचऱ्याची कमीत कमी निर्मिती व्हावी यासाठी आम्ही सातत्याने आमच्या पर्यावरणीय प्रदर्शनामध्ये सुधारणा करत असतो. पर्यावरणावर दुष्परिणाम घडवणाऱ्या कार्यपद्धती वगळण्यासाठीही आमचे प्रयत्न सुरू आहेत. 'कॉर्पोरेट सस्टेनेबिलिटी रिपोर्ट'मध्ये आमच्या सामाजिक जबाबदारी आणि स्थायी विकास कार्या बद्दल माहिती देण्यात आलेली असून हा अहवाल आमच्या www.visteon.com ह्या संकेतस्थळावर मिळू शकेल.

याव्यतिरिक्त, आम्ही आमच्या कर्मचाऱ्यांना स्थानिक पर्यावरणीय समस्यांचे निवारण करण्यासाठी प्रोत्साहन आणि समर्थन देतो. स्वयंसेवा आणि लोकोपकारक कामांच्या माध्यमातून आमचे कर्मचारी आपल्या समाजामध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी झटतात.

## उत्पादन सुरक्षा आणि गुणवत्ता

*आमच्या सर्वच कामकाजाचा विस्टेऑनच्या उत्पादने आणि सेवांवर परिणाम होऊ शकतो. आम्ही निर्माण करत असलेल्या उत्पादनांच्या सुरक्षा आणि गुणवत्तेप्रति आम्ही सर्व वचनबद्ध आहोत.*

सर्व लागू कायदे, नियम, स्वेच्छा प्रमाण आणि उद्योगातील कामकाज पद्धती यांची पूर्तता करण्यासाठी किंवा त्याही पलीकडे जाऊन अधिक काहीतरी प्रदान करणाऱ्या उत्पादनांचे डिजाईन, अभियांत्रिकी आणि उत्पादन करण्यासाठी विस्टेऑन समर्पित आहे. आमच्यावर असलेल्या ग्राहकांच्या विश्वासाची दखल घेऊन, आम्ही उत्पादन प्रदर्शनामध्ये निरंतर सुधारणेसाठी वचनबद्धता राखून उच्च-गुणवत्ता उत्पादने आणि सेवा प्रदान करण्यासाठी कायमच प्रयत्नशील असतो. ह्या वचनबद्धतेच्या माध्यमातून, सुरक्षेसाठी नेहमीच उच्च गुण प्राप्त करणारी उत्पादने आम्ही निर्माण करू शकतो.



## कंपनी मालमत्ता आणि माहिती

*विस्टेऑनच्या मालमत्तेचा दुरूपयोग होऊ नये याची जबाबदारी सर्व कर्मचाऱ्यांवर आहे. ह्या मालमत्तेमध्ये यंत्रे किंवा माल अशा वास्तविक तसेच व्यवसाय माहिती आणि बौद्धिक संपदा यांसारख्या अन्य काल्पनिक मालमत्तेचा समावेश आहे.*

विस्टेऑनच्या प्रदर्शन आणि स्पर्धात्मक फायद्यासाठी महत्त्वपूर्ण अशा कंपनी नोंदी, मालमत्ता, तांत्रिक माहिती, संदेश आणि व्यवसाय संधींचा मौल्यवान मालमत्तेमध्ये समावेश असू शकतो. विस्टेऑनची व्यवसाय उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी कंपनीच्या ह्या मालमत्तेचे दुरूपयोगापासून संरक्षण करणे गरजेचे आहे.

ह्या मालमत्तेचे संरक्षण करण्यामध्ये आकस्मिक प्रकटीकरणाला प्रतिबंध करणे गरजेचे आहे. ही जबाबदारी आणि निर्बंध ईलेक्ट्रॉनिक माहिती पद्धतीला ह्यईमेल, इंटरनेट, इत्यादीह लागू आहे. विस्टेऑन कर्मचारी नीतिच्या विरोधात जाणाऱ्या कुठल्याही ईलेक्ट्रॉनिक संवाद वापरण्यावर किंवा त्याची निर्मिती करण्यावर प्रतिबंध केला जातो.

## पुस्तके, रेकॉर्ड्स आणि फायलिंग्स

*कर्मचाऱ्यांनी अचूक नोंदी राखणे गरजेचे आहे. तसेच नियामक मंडळ आणि आमच्या जनहितधारकांसाठी जारी केलेल्या माहितीमध्ये संपूर्ण, निष्पक्ष, योग्य वेळेवर आणि समजेल अशा पद्धतीने मुद्दे मांडणे गरजेचे आहे.*

आर्थिक आणि अन्य संबंधित रिपोर्टिंगमधील आमच्या प्रामाणिकतेच्या आधारावर, समभागधारक आणि गुंतवणूक समुदायाशी विस्टेऑनचे संबंध जोडलेले आहे. सरकार किंवा अन्य नियामक मंडळांसोबत कंपनीतर्फे फाईल करण्यात आलेल्या कागदपत्रांमधील माहिती संपूर्ण, निष्पक्ष, अचूक, योग्य वेळेवर आणि समजेल अशा प्रकारची असेल यासाठी आमच्याकडून सगळे प्रयत्न केले गेले पाहिजेत. यात सिक्युरिटीज एक्सचेंज कमिशन आणि अन्य कंपनी माहितीपत्रकांचाही समावेश आहे. याव्यतिरिक्त, आर्थिक नोंदी, खर्च पत्रक आणि अभियांत्रिकी किंवा अन्य तांत्रिक कागदपत्रे निर्माण करताना किंवा त्यांची समीक्षा करताना कुठल्याही नोंदींची अचूकता पडताळून पाहणे आपल्या सर्वांसाठी बंधनकारक आहे.

सरकारी शोधकार्य आणि तपासणीमध्ये त्यांना सहकार्य करणे ही विस्टेऑनची नीति आहे. सरकारी आदेश, वटहुकूम, समन्स, कायदेविषयक पडताळणीसंबंधी अधिक माहिती प्रदान करण्याबद्दल अर्ज किंवा काही कागदपत्रे पाहायला हवी असल्याची मागणी अशा बाबतीतील माहिती त्वरित कायदे विभागाकडे सोपवण्यात यावी. यात मुलाखतीसाठीची विनंती, कागदपत्रांसाठीचे अर्ज किंवा कुठल्याही तपासकार्य किंवा खटल्यासंबंधी कुठल्याही विनंती किंवा अर्जांचा समावेश आहे.

कागदपत्रांची सत्यता आणि प्रामाणिकता बाधित करणे किंवा एखाद्या सरकारी तपासकार्य किंवा कायदेविषयक कारवाईमध्ये वापर करणे अशा उद्देश्याने त्या कागदपत्रांना नष्ट करणे किंवा त्यात बदल करणे हा गुन्हा आहे. कुठल्याही अनिर्णीत, धोकादायक किंवा अपेक्षित खटला, तपासकार्य किंवा लेखा परीक्षा यांच्याशी संबंधित कुठलीही कागदपत्रे कुठल्याही कारणासाठी नष्ट केली जाऊ शकत नाहीत. कंपनीच्या नोंदी चुकीच्या पद्धतीने हाताळले जात असल्याची, त्यात अनुचित बदल घडवण्यात येत असल्याची, ते नष्ट केले जात असल्याची किंवा विस्टेऑनच्या 'रेकॉर्ड रिटेंशन पॉलिसी'च्या विरोधात जाणाऱ्या गोष्टी करण्यात येत असल्याची शंका आल्यास त्याबद्दल कायदे विभागाला माहिती द्यावी.

याव्यतिरिक्त, लेखा परीक्षण, लेखांकन किंवा आर्थिक बाबींशी संबंधित स्वतंत्र लेखा परीक्षक किंवा अंतर्गत लेखा परीक्षण कर्मचारी विभागाचे सदस्य यांना चुकीच्या मार्गावर नेणे किंवा त्यांना चुकीच्या मार्गावर जाण्यासाठी भाग पाडणे अशा गोष्टींचा गंभीर कायदेविषयक परिणाम होऊ शकतो. यात अपराधिक दंडाचाही समावेश असू शकतो.



## बौद्धिक संपदा आणि गोपनीयता

*ग्राहक, पुरवठादार आणि अन्य व्यवसाय संपर्कांमधून अनेकदा गोपनीय किंवा कुणाचा तरी मालकी हक्क असलेली माहिती विस्टेऑनकडे येते. विस्टेऑनच्या मालकीच्या माहितीप्रमाणेच ह्या माहितीचेही संरक्षण केले गेले पाहिजे.*

नवनवीन शोध, कल्पना आणि अन्य प्रकारची बौद्धिक संपदा ह्या विस्टेऑनच्या यशाच्या महत्त्वपूर्ण भागीदार आहेत. परिणामी, पेटंट्स, ट्रेड सीक्रेट्स संरक्षण, कॉपीराईट्स, ट्रेडमार्क्स किंवा अशाच काही अन्य मार्गांच्या माध्यमातून मौल्यवान कंपनी तंत्रज्ञानाचे संरक्षण करण्यासाठी आम्ही दक्ष असतो. अन्य कंपन्या किंवा व्यक्तींच्या बौद्धिक संपदेचा अवैध वापर होऊ नये यासाठीही विस्टेऑन तेवढीच दक्ष असते.

जागतिक माहिती आणि तंत्रज्ञान नीतिच्या संपूर्ण साच्याच्या माध्यमातून विस्टेऑन कॉर्पोरेट डाटा आणि ज्ञानाचेही संरक्षण करते. माहितीचा अवैध वापर होऊ नये तसेच आमच्या संवाद प्रणालीतून पाठवल्या जाणाऱ्या माहितीवर नियंत्रण असावे यासाठी ही नीति कंपनीच्या व्यवसाय माहिती आणि संपदेच्या सुरक्षेसाठी मार्गदर्शन करते.

## इनसायडर ट्रेडिंग

*गोपनीय आणि प्रोपरायटरी माहितीचे अवैध वापरापासून संरक्षण करून आम्ही कंपनीच्या मौल्यवान संपदेचे रक्षण तर करतोच पण इनसायडर ट्रेडिंगशी संबंधित कायद्यांच्या पूर्ततेचेही अनुपालन करतो.*

विस्टेऑनच्या माहितीचा अवैध वापर आणि कायद्याचे उल्लंघन याचे इनसायडर ट्रेडिंग हे एक उदाहरण आहे. समभाग किंवा अन्य सिक्युरिटीजची खरेदी किंवा विक्री करताना जाहीर न झालेल्या पण आपल्या नोकरीमुळे मिळणाऱ्या माहितीचा वापर करून एखादी व्यक्ती जर आपला लाभ करून घेत असेल तर त्याला इनसायडर ट्रेडिंग असे म्हणतात. हे चुकीचे आणि अवैध आहे. स्वत:च्या आणि इतरांच्या ह्यपरिवारातील सदस्य किंवा मित्रह फायद्यासाठी ह्या माहितीचा वापर करून विस्टेऑनच्या सिक्युरिटीज किंवा इतर कुठल्याही कंपनीच्या सिक्युरिटीजची खरेदी किंवा विक्री करणे अयोग्य आहे. संपादन किंवा धोरणात्मक भागीदारी अशा प्रकारचा विस्टेऑनचा अनिर्णीत व्यवहार असलेल्या कंपनीबद्दल 'टिप' देण्यासही प्रतिबंध आहे कारण अर्थातच बहुतेक वेळा अशा व्यवहाराची घोषणा जाहीररित्या झालेली नसते.



## स्वारस्यामधील भिन्नता

*कर्मचाऱ्यांचे स्वारस्य आणि विस्टेऑनचे स्वारस्य यात अंतर असायला नको . जर अशा प्रकारचे काही स्वारस्यातील भेद असतीलच तर त्याबद्दल सर्वोत्तम काय करता येऊ शकेल यासाठी मार्गदर्शन घ्या आणि अशा भेदांचे कारण असलेले व्यवहार किंवा संबंध यावद्दल संपूर्ण माहिती द्या .*

कर्मचाऱ्यांनी विस्टेऑनच्या वतीने आमच्या कामकाजामध्ये चांगली निर्णयक्षमता आणि महत्तम नीतिमत्ता दर्शवावी अशी अपेक्षा आहे . कंपनीबाहेरही आपण कसे वागतो यावरून आपली कंपनी विस्टेऑन कंपनी म्हणून कशी आहे याबद्दल लोक आडाखे बांधत असतात याबद्दल आपण वागताना विचार करायला हवा . आपल्या किंवा आपल्या कंपनीच्या विरोधात जाणारे कुठलेही कामकाज, गुंतवणूक किंवा स्वारस्य आपण टाळायला हवे . अधिक स्पष्टपणे सांगायचे तर कंपनीच्या विरोधात जाण्याची क्षमता असलेले काहीही करणे कर्मचाऱ्यांनी टाळायला हवे .

यात पुढील उदाहरणे आणि त्याव्यतिरिक्त अन्य अनेक गोष्टींचा समावेश असू शकतो :

- विस्टेऑनशी व्यापार करत असलेल्या प्रतिस्पर्धी कंपनी, ग्राहक, पुरवठादार किंवा अन्य फायद्यासाठी असलेल्या व्यवसायामध्ये 2.5 टक्क्यांहून अधिक आर्थिक स्वारस्य असणे
- एखादी संबंधित व्यक्ती नेतृत्वस्थानी असलेल्या कंपनीला किंवा ज्यात कंपनीशी व्यवहार करून आर्थिक फायदा होईल अशा कंपनीला कामाचे कंत्राट देणे
- विस्टेऑनशी व्यापार करत असलेल्या प्रतिस्पर्धी कंपनी, ग्राहक, पुरवठादार किंवा अन्य फायद्यासाठी असलेल्या व्यवसायासोबत सल्लागार, व्यवस्थापकीय किंवा रोजगार संबंध असणे
- विस्टेऑनला स्वारस्य असलेल्या गोष्टींचा मालकी हक्क संपादन करणे
- विस्टेऑनसोबत व्यवसाय करत असलेल्या किंवा व्यवसाय करण्याची इच्छा असलेल्यांकडून नाममात्र मूल्याहून अधिकच्या ह्यह्याबाबतीत युएस डॉलर्स 50 हून अधिक मूल्य असलेल्याह भेटवस्तू, मनोरंजन किंवा अन्य प्रस्ताव स्वीकारणे
- अशा व्यक्तींकडून तुमच्या किंवा तुमच्या परिवारासाठी नकद, उत्पादन किंवा सेवा सवलती, कर्जे किंवा सह-हस्ताक्षर व्यवस्थेचा स्वीकार करणे
- तुमच्या प्रवास, राहण्याची व्यवस्था किंवा अशाच काही सेवा स्वीकारणे
- कुठल्याही भेटवस्तू, मनोरंजन किंवा अन्य गोष्टी मागणे
- कुठल्याही प्रकारचे प्रौढ मनोरंजन .

भेटवस्तू आणि मनोरंजनासंबंधीच्या ग्राहक आणि पुरवठादार नीतिंबद्दल कर्मचाऱ्यांना माहिती असायला हवी आणि अशा नीति त्यांच्यावर बंधनकारक असायला हव्यात . काही प्रकारचे कॉर्पोरेट-प्रायोजित मनोरंजन अधिक बळकट कामकाज संबंध प्रस्थापित करण्यासाठी योग्य आणि कायद्यानेही वैध असू शकते हे विस्टेऑन जाणून आहे . अर्थात व्यवसाय मनोरंजन हे वैध, उचित, अगदी कधीतरी आणि न्यायप्रविष्ट असले पाहिजे हे लक्षात घ्या . एखाद्या वेळेस दोन्हीपैकी एखादा पक्ष अचानक जेवणासाठी बाहेर घेऊन गेला तर ते चालू शकते पण अशा जेवणाचे आधीच ठरवून त्यासाठी नेहमीच जर पुरवठादारच पैसे भरणार असेल तर ते चालणार नाही . एखाद्या खेळाच्या कार्यक्रमासाठीचे सीझन तिकीट चालणार नाही पण अशाच एखाद्या कार्यक्रमासाठी कधीतरी एकदाच बोलावले गेले तर ते चालू शकेल . अनेक देशांमध्ये मद्य हे भेटवस्तूच्या रूपात देण्याला अनुमति नाही . कुठल्याही भेटवस्तू किंवा प्रस्ताव किंवा मनोरंजनाचा एखादा प्रस्ताव याच्या योग्यतेविषयी काही प्रश्न असले तर ते कायदे विभागाकडे पाठवण्यात यावेत .



## निष्पक्ष व्यवहार आणि स्पर्धा

*आम्हांला पूर्ण शक्तीने स्पर्धा आणि निष्पक्ष व्यवहार करायचा आहे. हेराफेरी, चोरी, छुपेगिरी, गोपनीय माहितीचा अवैध वापर, चुकीचे चित्र उभे करणे किंवा अन्य अनुचित व्यवहारांच्या माध्यमातून गैरफायदा घेण्यास आमचा पूर्ण विरोध आहे.*

प्राईस फिक्सिंग, अनुचित स्पर्धा किंवा बाजारपेठेमध्ये अनुचित पद्धतीने प्रभाव पाडणारे कुठलेही कामकाज यांना विस्टेऑन नीति तसेच ॲन्टिट्रस्ट कायदा प्रतिबंध करतो. स्पर्धात्मक माहिती मिळवणे किंवा अवैध मार्गांनी स्पर्धात्मक फायदा प्राप्त करून घेणे यावर प्रतिबंध आहे. या गोष्टींमध्ये पुढील आणि त्याव्यतिरिक्तही अन्य गोष्टींचा समावेश असू शकतो.

- प्रतिस्पर्धी कंपन्यांसोबत किंमती, खर्च, उत्पादन प्रमाण, लिलावाची बोली किंवा लिलाव प्रक्रिया, भौगोलिक कार्यक्षेत्र, आयात किंवा निर्यातीवरील बंधे, वितरण माध्यमे किंवा ग्राहक यांबाबत चर्चा करणे
- निश्चित भावानुसार किंवा त्याहून अधिक किंमतीवर उत्पादन विकण्याची किंवा भाडयावर घेण्याच्या ग्राहकाच्या क्षमतेवरील निर्बंध.

ॲन्टिट्रस्ट आणि निष्पक्ष वागणूक समस्या खूप गुंतागुंतीच्या असू शकतात. काय करण्यास अनुमती आहे आणि काय करणे अयोग्य आहे ही बाब अतिशय तांत्रिक आणि बाजार संरचनेवर आधारित असू शकते. जर कुठल्याही गोष्टीबाबत काहीही शंका असेल तर कायदा विभागाशी संपर्क साधावा.



## आंतरराष्ट्रीय व्यवसाय आणि सरकारी नियम

*विस्टेऑनचे कामकाज असलेल्या प्रत्येक देशातील लागू कायद्यांनुसार विस्टेऑनचे सर्व कर्मचारी, एजंट आणि प्रतिनिधी त्या कायद्यांचे व्यवस्थित पालन करतील अशी अपेक्षा आहे. वर्णभेद, बालकामगार आणि जबरदस्तीने काम करून घेण्याविरोधातील कायद्यांचाही यात समावेश आहे.*

सरकारी किंवा आंतरराष्ट्रीय व्यवसाय बाजारपेठेशी निगडीत लोकांसाठी फॉरेन करप्ट प्रॅक्टिसेस ॲक्ट ह्यएफसीपीएह हा महत्त्वाचा आहे. विस्टेऑनचे कामकाज असलेल्या जगातील कुठल्याही देशातील कर्मचारी किंवा प्रतिनिधींसाठी एफसीपीए लागू आहे. एफसीपीएअंतर्गत, अधिक चांगली सरकारी वागणूक मिळवण्यासाठी विदेशी अधिकारी, राजकीय पक्ष किंवा राजकीय पक्षांचे सदस्य यांना कुठल्याही प्रकारचे प्रस्ताव किंवा पैसा देण्यावर निर्बंध आहे. ह्या निर्बंधामध्ये केवळ पैसाच नव्हे तर मूल्य असलेले अन्य कुठल्याही गोष्टीचा समावेश आहे. तसेच केवळ सरकारी अधिकारीच नव्हेत तर त्यांचे प्रतिनिधी किंवा कुटुंबातील सदस्य यांचाही त्यात समावेश आहे. काही मर्यादित परिस्थितींमध्ये जिथे कायद्याने हक्क असलेल्या सरकारी सेवा मिळवण्यासाठी काही नाममात्र शुल्क भरावे लागत असेल तर त्याने मात्र एफसीपीएचा भंग होत नाही.

विस्टेऑनचे कामकाज असलेल्या एखाद्या देशात अशा प्रकारचे मूल्य अदा करणे हे वैध आणि परंपरेला धरून असले तरी कायदे विभागाकडून त्यासाठी पूर्व अनुमति घेतल्याशिवाय केले जाऊ शकत नाही. जेव्हा कधीही विस्टेऑनचे कर्मचारी किंवा अन्य प्रतिनिधी, सरकारी प्रतिनिधी किंवा विदेशी अधिकारी यांना भेटवस्तू किंवा राजकीय किंवा धर्मार्थ दानधर्म करण्याच्या विचारात असतील तर त्यांना त्यासाठी कायदे विभागाकडून अनुमति घेणे गरजेचे आहे.

विस्टेऑनचे कामकाज असू शकणाऱ्या तसेच ते माहिती आणि उत्पादने निर्यात करू शकणाऱ्या देशांमध्ये अनेक कायद्यांचे बंधन असू शकते. कुठल्याही नवीन देशामध्ये व्यावसायिक प्रवेश करण्याआधी कायदे विभागाचा सल्ला घ्या.

# सारांश

सारांशलोकांनी योग्य वागणे हीच त्यांची खरी नीतिमत्ता असते – कायद्यातील पळवाटा शोधून किंवा ह्या नीतिमधील कमकुवत गोष्टींचा आधार घेऊन स्वत:चा फायदा पाहणे किंवा इतरांना फायदा होईल अशा प्रकारे वागणे याला नीतिमत्ता म्हणत नाहीत . आपण सर्वांनीच ह्या नीतिचे पालन आणि संरक्षणही करायला हवे . कंपनीच्या नीतिमत्तेच्या विरोधात जाणाऱ्या कारवाया किंवा कार्यपद्धती दिसून आल्यास त्याबद्दल सवाल उठवला पाहिजे आणि त्या रिपोर्ट करायला पाहिजेत . ह्या नीतिच्या विरोधात जाणाऱ्या गोष्टींबाबत रिपोर्ट करणारे विस्टेऑनच्या व्यवसाय विकासाला हातभार लावतील . त्यामुळे नीतिमत्तेसाठी समर्पित कंपनी म्हणून विस्टेऑनचे नाव कायम लोकांच्या मनात राहायला मदत होईल .

वैध आणि नैतिक व्यवसाय व्यवहार, आर्थिक बाबींची नोंद, लेखांकन पद्धती, अंतर्गत नियंत्रण किंवा लेखा परीक्षण यांच्याशी संबंधित काही समस्या असतील तर त्या कंपनीच्या लक्षात आणून देण्यासाठी विस्टेऑन आपल्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देते . एखाद्या व्यक्तीने अशा प्रकारचे रिपोर्टिंग केले म्हणून त्याच्या विरोधातील कारवायांविरोधात त्या व्यक्तीला संरक्षण देण्याची विस्टेऑनची नीति आहे . अशा प्रकारची माहिती निदर्शनास आणून देण्यासाठी गोपनीय आणि अनामिक पद्धती उपलब्ध आहे आणि त्याबद्दल पुढे माहिती प्रदान करण्यात आली आहे . कंपनी कार्यकारी व्यक्ती, अधिकारी आणि वरिष्ठ व्यवस्थापक तसेच विस्टेऑनच्या संचालक मंडळाचे सदस्य असे सगळेच ह्या नीतिचे पालन करणे अपेक्षित आहे . ह्या नीतिच्या विरोधातील कामकाज जर कोणी करत असेल तर त्या व्यक्तीला कामावरून बडतर्फ करण्यापर्यंत कुठलीही कारवाई केली जाऊ शकते . जर तुम्ही अशा एखाद्या परिस्थितीत असाल की जेव्हा ती परिस्थिती ह्या नीतिच्या विरोधात जात असेल किंवा जाऊ शकेल, तर तुम्ही त्या परिस्थितीबद्दल स्पष्टपणे बोलायला हवे आणि मार्गदर्शन घ्यायला हवे .

ज्या कर्मचाऱ्यांच्या मनामध्ये अनुपालनाबद्दल काही प्रश्न किंवा समस्या असतील तर त्यांनी त्याबद्दल आपले व्यवस्थापक, मनुष्यबळ अधिकारी किंवा न्याय विभागासोबत चर्चा करायला हवी .

विस्टेऑनच्या नैतिक प्रमाणांबद्दल जर कर्मचाऱ्यांच्या मनात काही प्रश्न किंवा समस्या असतील तर त्या सोडवण्यासाठी तसेच व्यवस्थापन, मनुष्यबळ किंवा न्याय विभागासोबतच्या चर्चांमधून जर समाधानकारक उत्तर मिळाले नाही तर विस्टेऑनच्या संचालक मंडळाच्या लेखापरीक्षण समितीसोबत संवाद साधण्यासाठी किंवा अशा प्रकारची चर्चा करणे काही कारणास्तव शक्य नसेल तर जागतिक हॉटलाईन उपलब्ध असेल .

*ह्या नीतिमध्ये न्यु यॉर्क स्टॉक एक्सचेंज आणि सार्बेन्स ऑक्सली ॲक्ट 2002 च्या कलम 406 च्या गरजांनुसार कंपनीच्या कोड ऑफ बिझनेस कंडक्ट आणि एथिक्सची पूर्तता करतात आणि कंपनीचे सर्व संचालक आणि कर्मचारी तसेच अधिकारी यांनी सचाईने, नीतिमत्तेने आणि कायद्याने वागावे यासाठी हे खास निर्माण करण्यात आलेले आहेत . संचालक किंवा कार्यकारी अधिकाऱ्यांसाठी ह्या नीतिमध्ये बदल करण्याचा अधिकार केवळ संचालक मंडळाला असेल . अशा प्रकारचे काही बदल करण्यात आल्यास लागू कायदे आणि / किंवा स्टॉक एक्सचेंज नियमांनुसार समभागधारकांना सांगण्यात येतील .*



**देशानुसार योग्य नीतिमत्ता आणि अनुपालन दूरध्वनी क्रमांक फिरवून नीति विरोधी बाबींबद्दल माहिती देता येऊ शकेल.**

## आंतरराष्ट्रीय टोल-फ्री सेवा (आयटीएफएस)

| देश | दूरध्वनी क्रमांक | भाषा |
|---|---|---|
| अर्जेंटिना | 0-800-444-8084 | इंग्रजी |
| अर्जेंटिना | 0-800-555-0906 | स्पॅनिश, इंग्रजी |
| ऑस्ट्रेलिया | 1-800-339276 | इंग्रजी |
| बेल्जियम | 0800-77004 | फ्रेंच, डच, जर्मन, इंग्रजी |
| ब्राझिल | 0800-8911667 | पोर्तुगीझ, स्पॅनिश, फ्रेंच, इंग्रजी |
| चीन ह्यउत्तरहह्ह् | 10-800-712-1239 | मॅंडरिन, कॅंटोनिझ, इंग्रजी |
| चीन ह्यदक्षिणहह्ह् | 10-800-120-1239 | मॅंडरिन, कॅंटोनिझ, इंग्रजी |
| झेक रिपब्लिक | 800-142-550 | इंग्रजी |
| फ्रांस | 0800-902500 | फ्रेंच, इंग्रजी |
| जर्मनी | 0800-1016582 | जर्मन, इंग्रजी |
| हॉंग कॉंग | 800-964214 | कॅंटोनिझ, मॅंडरिन, इंग्रजी |
| हंगेरी | 06-800-17199 | हंगेरियन, इंग्रजी |
| भारत | 000-800-100-1071 | इंग्रजी |
| इंडोनेशिया | 001-803-011-3570 | इंडोनेशिया, डच, इंग्रजी |
| इंडोनेशिया | 007-803-011-0160 | इंडोनेशिया, डच, इंग्रजी |
| जपान्ह्5 | 0066-33-11-2505 | इंग्रजी |
| जपान्ह्प् | 00531-121520 | जॅपनीझ, इंग्रजी |
| कोरिया ह्यदक्षिणह | 00798-14-800-6599 | कोरियन, इंग्रजी |
| मेक्सिको ह्यं15ह | 001-866-737-6850 | इंग्रजी |
| मेक्सिको ह्यनवीनह | 001-8008407907 | स्पॅनिश, इंग्रजी |
| फिलिपाईन्स | 1-800-1-114-0165 | फिलिपिनो, इंग्रजी |
| पोलंड | 0-0-800-1211571 | पोलिश, इंग्रजी |
| पोर्तुगाल | 8008-12499 | पोर्तुगीझ, इंग्रजी |
| रशिया | 8-10-8002-6053011 | रशियन, इंग्रजी |
| स्लोव्हाकिया | 0800-001-544 | इंग्रजी |
| दक्षिण आफ्रिका | 080-09-92604 | इंग्रजी |
| स्पेन | 900-991498 | स्पॅनिश, इंग्रजी |
| स्वीडन | 020-79-8729 | स्वीडिश, फिनिश, इंग्रजी |
| थायलंड | 001-800-12-0665204 | थाई, मॅंडरिन, इंग्रजी |
| युनायटेड किंगडम | 08-000328483 | इंग्रजी |
| व्हेनेझुएला | 0800-1-00-4586 | स्पॅनिश, इंग्रजी |

## एटी ॲन्ड टी डायरेक्ट ॲक्सेस

| देश | दूरध्वनी क्रमांक | आफ्टर टोन, डायल | भाषा |
|---|---|---|---|
| मोरोक्को | 002-11-0011 | 855-266-7041 | इंग्रजी |
| तुर्की | 0811-288-0001 | 855-266-7041 | इंग्रजी |

| देश | दूरध्वनी क्रमांक | भाषा |
|---|---|---|
| कॅनडा | 855-266-7041 | इंग्रजी |
| पोर्टो रिको | 855-266-7041 | इंग्रजी |
| युनायटेड स्टेट्स | 855-266-7041 | इंग्रजी |

* उत्तर चीनमध्ये बीजिंग, टियांजिन, हायलोंगजियान, जिलिन, लायओनिंग, शेडुंग, शान ह्य1हक्ष् हेबै, हेनान आणि इनर मोंगोलियाचा समावेश आहे.

** दक्षिण चीनमध्ये शांघाय, जिआंगसु, झेआंग, ॲन्वी, फुजियान, जिआंगजाय, हुबेई, हुनान, गुआंगडॉंग, गुआंगजाय, हैनान, चिंगकिंग, सिचुआन, युनान, तिबेट स्वायत्त क्षेत्र, शान ह्य3हक्ष् गांसु, क्विंघाय, निंक्सिआ, शिंगजियांग आणि स्वायत्त क्षेत्रांचा समावेश आहे.

**ऑनलाईन रिपोर्टिंगसाठी पुढील संकेतस्थळाला भेट द्या – www.visteon.ethicspoint.com**

**विस्टेऑन कॉर्पोरेशन**
वन विलेज सेंटर ड्राईव्ह
व्हॅन ब्युरेन टाऊनशिप,
MI 48111 युएसए

जुलै 2011